# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वर्ष ४४ अंक २

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

फेब्रुवारी २०२४ पौष/माघ शके १९४५


नमस्कार मित्र-मैत्रिणींनो,

मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा! गेल्या वर्षी २०२३ जानेवारीमध्ये, याच सुमारास महाराष्ट्र शासनाने पहिले मराठी विश्व संमेलन आयोजित केले होते. त्याला बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे उपस्थित रहाण्याचा मला योग आला. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे व्यापक काम आणि बीएमएम 2.0 ची संकल्पना, महाराष्ट्रात सुद्धा सगळ्यांना माहिती व्हायला पाहिजे याची गरज तेव्हा मला तीव्रपणे जाणवली. तेव्हा मी माननीय दीपक जी केसरकर यांना आश्वासन दिले की पुढल्या वर्षी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मोठे पथक आणि आपल्या सर्वांचे हे संमेलन यशस्वी करण्यासाठीचे सर्व प्रयत्न करेन. त्या आश्वासनाप्रमाणे मी माझ्या कार्यकारिणीच्या सदस्या सविता मोरे, यांना बृहन्महाराष्ट्र मंडळाचे एक मोठे पथक आयोजित करण्याची जबाबदारी सोपवली. सविता मोरे यांच्या fast आणि happening अशा यशस्वी नेतृत्वाखाली आणि प्रचंड मेहनतीतून, ३६ मंडळांतून, ७५ हुन अधिक जणांचे पथक तयार झाले. सविताबरोबर मंजुषा नाईक, विराज राऊत, सचिन प्रभूदेसाई, राहुल देशमुख, रणजीत कामत, आणि पार्थ आठवले या कार्यकर्त्यांचे योगदान पण महत्त्वाचे राहिले. आणि या आपल्या बीएमएम पथकाने २०२४ विश्व मराठी संमेलन तर गाजवूनच सोडले!



गेल्या वर्षी मी माननीय दीपकजी केसरकर यांच्या पुढे शाळा सहयोगाचा देखिल एक प्रस्ताव मांडला होता. तो यावेळी पुढे नेण्याच्या दृष्टीने माझे वर्षभर प्रयत्न चालू होते. मित्र-मैत्रिणींनो मला आज सांगायला अतिशय आनंद होत आहे की बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये करार होऊन शासनातर्फे शैक्षणिक विभागांना त्या अनुषंगाने आदेश देण्यात आले आहेत.

बृहन्महाराष्ट्र मंडळाला शैक्षणिक संस्था म्हणून दर्जा मिळणे ही आपल्या सगळ्यांच्या अभिमानाची गोष्ट आहे. आजपर्यंतच्या सर्व शाळा प्रकल्प कार्यकर्त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पुढाकाराने व नेतृत्वाने हिच यंत्रणा आता इतर देशांतील मराठी संस्थांसाठी सुद्धा उपलब्ध झाली आहे! पुढचे पाउल म्हणून बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२४ बे एरिया अधिवेशनात जागतिक मराठी संस्थांची २७ जूनला परिषद भरवत आहे. भारताबाहेरच्या मराठी वसाहतींच्या समान मूलभूत गरजा काय आहेत व त्यावर आपण एकत्रित कसे काम करायचे हे या परिषदेचे उद्दीष्ट आहे. (bmm2024.org).

प्रयत्न आपले, पण कार्यसिद्धी ही प्रकृतीची योजना असते. त्याचाच एक अविस्मरणीय अनुभव बीएमएम पथकातील २६ जणांना आला - या संमेलनाच्या मोहीमेतूनच जानेवारी ३०-३१ ला बीएमएम पथकाला रामजन्मभूमीकडून बोलावणे आले. जन्मस्थळावर श्री रामाची उभी मूर्ती बघतानाचा अनुभव कुठल्याही सामान्य लेखणीतून उतरणे अशक्यच आहे. प्रत्येकाला तो स्वतःच्या हृदयात आणि ओलावल्या डोळ्यातूनच घ्यायला हवा. ती मुर्ती बघण्याचा योग आणि तो अविस्मणीय अनुभव प्रत्येकाला यावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना. आता समर्थ रामदास स्वामींच्या एका श्लोकाने थांबतो:

**समस्तांमधे सार साचार आहे। कळेना तरी सर्व शोधून पाहे॥**
**जिवा संशयो वाउगा तो त्यजावा। प्रभाते मनी राम चिंतीत जावा॥ ७५**

जय हिंद, जय महाराष्ट्र, गॉड ब्लेस अमेरिका आणि जय श्री राम,


संदीप दीक्षित, *अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४*
+1 216-926-6696 sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
bmm2.org/app

#bmm2 #bmm2024 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि महाराष्ट्र शासन यांच्यामधील करारासंदर्भातील अधिक माहिती पान क्रमांक ५ वर पहा.

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र

स्थापना १९८१ (शिकागो)

संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:

ईमेल: vrutta@bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-

BMM Treasurer - Rajan S Pednekar

20611 Whitebud CT. Tampa FL 33647

Ph- 813-546-1330

Email: Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर**:- $25/ year

Subscription payment is accepted online by Paypal: https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100

पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष: | विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय |

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन अहवाल | ३ |
| A Tribute to Shirish Gupte | ३ |
| युवा संपादकीय: २०२३-२४ युवा कमिटी | ४ |
| बी एम एम रेशीमगाठी | ५ |
| कविता - अक्षरे | ५ |
| BMM Yuwa Internship 2024 | ६ |
| कविता - मराठी | ६ |
| कविता - संघर्ष | ७ |
| आठवणींचा खजिना | ८ |
| कविता - सखा कृष्ण | ९ |
| मागे वळून पाहू जरा | ९ |
| कविता - अशा सांजवेळी | १० |
| जाहिरात | १० |
| जाहिरात | ११ |

## संपादक समिती

वृत्त संपादनाची धुरा नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना ईमेलद्वारे जरूर कळवा.

**संपादक समिती**

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
राजन पेडणेकर


**वाचकहो कल्पना करा** - तुम्ही अचानक २००४ च्या फेब्रुवारी महिन्यात जाऊन पोहोचला आहात!! मागची २० वर्षे दुसऱ्यांदा जगायची संधी मिळाली, तर तुमच्या जीवनात ह्या वेळेस तुम्ही काय बदल कराल? तुमचे मत नक्की कळवा.


Email - Vrutta@Bmmonline.org

आलेल्या प्रतिक्रियांपैकी निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. **शब्दमर्यादा: १०० शब्द.**

## बृहन्महाराष्ट्र  मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाचा अहवाल

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनात तत्वज्ञान आणि अध्यात्म या विषयांवर आपल्याशी संवाद साधण्यासाठी येत आहेत तीन नामवंत वक्ते: गुरु गोपालदास, परम पूज्य गोविंदगिरी महाराज आणि कीर्तनकार श्री चारुदत्त आफळे. आपण या संधीचा जरूर लाभ घ्यावा.







---

## A Tribute to Shirish Gupte

Shirish Gupte (1951-2023) was a beloved family man, loyal friend, and a patriotic citizen. During the day, he was a transportation professional, in the evening, he was a social worker who fought to bring social and economic justice to all.

As an Engineer and Physicist, he built his career in the transportation sector, working on America's most notable rail networks. He was driven, a visionary, and a master of finding order in the chaos. Many young professionals can attest that his silent guidance and mentorship helped them grow and succeed.

Shirish was an avid reader. He absorbed information from all mediums and could speak on just about any topic or, become a subject matter expert on any topic in a short timeframe. He was a generous, fun-loving spirit, and a commensurate host. He loved having friends and family over, welcoming them with his trademark BBQ tandoori chicken, bread bowls, and plenty else. He also loved to travel all over the world - especially if it involved loading up the van and driving for miles, for Maharashtra Foundation (MF) fundraising events.

As a two-term president of MF, Shirish dedicated his life to the less fortunate - he invested in the future of those with no future, so they could reinvest in themselves.  His love for Marathi culture inspired him to join the Marathi Vishwa (NJ) Executive Committee, and his selfless nature and ability to find a solution to any problem helped raise and donate over $10 million to hundreds of NGOs.

He frequently quoted George Bernard Shaw, "progress is impossible without change, and those who cannot change their minds cannot change anything." He helped people become agents of change in their community and guided them to bring about a positive change. Later in life, he joined his wife, Darshana, in tackling climate change both locally and nationally, mentoring others through *Climate Reality* training across the U.S. and leading a Building Safety Committee for bettering the City of San Antonio.

Shirish was a man who enjoyed his life and wouldn't have done it any differently.

**Eshani & Soham Gupte, Ankush Karnik**

## युवा संपादकीय: २०२३-२४ युवा कमिटी

गार्गी सुकुमार बेरी BMM वृत्ताच्या युवा विभागाची संपादक आहे. या वर्षी आपल्या North अमेरिकेतल्या सर्व दहा हजार युवा मंडळींना एकत्र आणण्याचे ध्येय युवा कमिटीसमोर आहे. Yuwa Committee is working under the guidance of BMM President, Sandeep Dixit and BMM EC Lead and Yuwa coordinator Savita More.



केतकी नाईक, युवा खजिनदार

(Ketki Naik, Yuwa treasurer)

केतकी सेंट लुईस मराठी मंडळाची सदस्य आहे. ती विद्यार्थिनी असून, तिला वाचन, चित्रकला, गायन आणि प्रवासाची आवड आहे.



**रेवती आठवले, युवा सोशल मीडिया**

(Revati Athavale, Social Media Coordinator)

रेवती Maharashtra Mandal of Central Pennsylvania (MMCPA) ची सदस्य आहे. By profession she is a Software Engineer.

तिला hiking, photography, reading, cooking ची आवड आहे. Her whole goal is to focus on building a community for Marathi yuwa in North America – utilizing social media to build connections across the US and Canada and to make the world feel just a little bit smaller.



**गार्गी बेरी, युवा संपादक**

(Gargi Beri, Yuwa Editor)

San Diego Maharashtra mandal (SDMM) ची सदस्य आणि ढोल ताशा पथक प्रमुख आहे. सध्या Electrical Engineer म्हणून कार्यरत आहे. Hiking, music, reading आणि नवनवीन भाषा शिकणे यांची आवड आहे. Newsletter आणि social media च्या माध्यमातून मराठी learning program साठी ती योगदान देणार आहे.

नोंद: युवा कार्यकारणीच्या सविता मोरे (BMM EC and BMM Yuwa Lead) आरती कारकर (युवा अध्यक्ष), आर्या भोईटे (युवा सचिव) यांची ओळख जानेवारी २०२४ च्या अंकात झाली होती.

Marathi Learning Corner:

**गाढवाला गुळाची चव काय**

"म्हण" म्हणजे proverb. (Plural : म्हणी) गाढवाला गुळाची चव काय या गमतीदार म्हणीचा अर्थ : " A donkey doesn't know the taste of jaggery" meaning, a foolish person cannot understand the value of something valuable.

A : I think Anime फार overrated आहे !
B : Of course you'd think that! गाढवाला गुळाची चव काय!

बऱ्याचदा आपल्या आजूबाजूला अश्या चर्चा होत असतात... तेव्हा तुम्हाला कधी ही म्हण वापरता आली का??? आम्हाला social media वर जरूर कळवा.

@bmmyuwa

**राशिभविष्य : फेब्रुवारी २०२४**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि महाराष्ट्र शासन करार

बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये करार होऊन शासनातर्फे शैक्षणिक विभागांना याप्रमाणे आदेश देण्यात आले आहेत:

**अ)** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका यांचे मार्फत मराठी भाषा शिकत असणाऱ्या इयत्ता १ ली ते ५ वी विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे (बालभारती) यांचे मार्फत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यात येईल.

**ब)** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका यांना स्थानिक गरजेनुसार आवश्यक असल्यास पाठ्यपुस्तकांमध्ये २०% पर्यंत बदल करून देण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे (बालभारती) यांना राहील.

**क)** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत प्रश्नपत्रिका तयार करणे तसेच आवश्यकतेनुसार बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरीका यांच्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी राहील.

**ड)** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरीका यांच्या शाळेतील इयत्ता ५ मधील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, यांची राहील.

सादर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०१२९१९०८४५१२२१ (*pdf*) असा आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने काढण्यात येत आहे.

https://bmmonline.org/marathi-shala/

## अक्षरे

ख्यालीखुशाली पुसणारी ती अक्षरे
काळजातल्या शाईत बुडालेली
मनामनातले दुवे सांधणारी ती अक्षरे
आसवांच्या ठिपक्यात भिजलेली.........

मैलोनमैल प्रवास करणारी
घटकेत सारा दुरावा संपवणारी
सणासुदीच्या आठवणीत भिजणारी
मनातल्या मजकुराने लकाकणारी.........

सुखदुःखात साथ करणारी
मायेचा अलिखित स्पर्श कुरवाळणारी
काळजीच्या सुरानी ओथंबणारी
आठवांचा पाढा वाचून भेटीस आसुसणारी.......

पत्रास कारण की म्हणून थबकणारी
प्रिय म्हणून आशीर्वचने बरसवणारी

माणसाचे मन वाचू शकणारी
लांबूनही खूप जवळची वाटणारी ..........

कागद शाई अश्रू आता आहेत बासनात
कळवळणाऱ्या चिन्हांची आहे बरसात
ये हृदयीचे ते हृदयी सांगणारी म्हणतात
पण ती आभासी अक्षरेच हल्ली फसवतात.......

**शिल्पा कुलकर्णी**

https://bmmonline.org/

## BMM Yuwa Internship 2024 Announcement

BMM 2022-24 is excited to announce the BMM Yuwa Internship 2024 program for Shala and Yuwa students (age 14 and above), in the fields of Medicine, Finance, Engineering and many more! BMM is partnering with numerous professionals, businesses and organizations this year, to develop the content.

BMM will issue BMM Certificates and BMM credit hours to the interns for successfully completing their assigned projects and a set number of working hours. Interns can accumulate BMM credit hours for which they will receive College tuition assistance/grants. Dollar amount to be decided at a later date, based on availability of funds.

<u>Program details:</u>

**Duration**: Mandatory 30 hours in June, plus 4 meetings with mentors. Complete projects and post stories.

**Earned BMM Credit hours**: 3

**Monetary Value:** TBD/BMM Credit Hour

**Age requirement**: High-school and College students (14+)

**Application Deadline:** March 15, 2024

To be considered for BMM Internship program please complete the form below by March 15, 2024:

https://bmm2.org/2024-yuwa-internship-signup

**Our past interns have shared their success stories**:

The internship program exposed me to a variety of unique careers in the medical field. It gave me the opportunity to directly engage with healthcare professionals and learn more about their role and career journey. I even got to practice patient diagnosis and make treatment plans for case studies! - आर्या

I really enjoyed being a part of this internship! The medical internship allowed me to improve my medical professional skills, as well as my networking skills. I was familiarized with the different medical fields and even got to meet doctors in each field! - केतकी

यावर्षीदेखील भरपूर उत्साहाने तुम्ही internship साठी sign-up कराल अशी खात्री आहे. त्याची माहिती आम्ही email द्वारे तुम्हाला कळवू. यासोबतच कॉलेज counseling आणि BMM Yuwa च्या इतर उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी, खालील QR code scan करून युवा network मध्ये सामील व्हा.

## मराठी ...

माझी मायबोली! म्हणून ती "आपली"....

शब्दांनी नटली! म्हणून भावली.....

काव्यांत रंगली! म्हणून आवडली....

सुरात गायली! म्हणून रंगली...!

लेखांत गुंफली! म्हणून समजली...

कथेत गुंतली! म्हणून रमली...

कादंबरीत घुसली! म्हणून रेंगाळली....

विनोदानी हसली! म्हणून बिलगली....

नवरसांत नहाली! म्हणून  समृध्द झाली...

अशी मराठी आपुली! जिवाभावाची झाली!

**चित्रा मेहेंदळे**

## संघर्ष

आपण खरंच स्वतःला थोडा वेळ देतो का? फक्त म्हणजे फक्त स्वतःच्या मनासाठी काही करतो का? मोठ्या गोष्टी तर नंतरच्या, छोट्या गोष्टींसाठी तरी वेळ काढतो का? की, 'ठीक आहे', 'पुन्हा कधीतरी करू', 'त्यात काय एवढं', म्हणून छोटे छोटे आनंद पुढे ढकलतो? तुम्हाला आलाय का कधी अनुभव?

रात्री उशीवर डोकं टेकलं, की मन माझं जागं होतं
त्या किर्रर्र अंधारातही, दार उघडून ते बाहेर येतं
शेवटची घंटा झाल्यावर, मुलांना आनंद होतो जसा
गोठ्याचे दार उघडल्यावर, अगदी गाई गुरांना होतो तसा.

बाहेर येताच पाखरासारखं, मन तिथेच बागडत राहतं
अंधाराच्या खोलीत त्याला, काय माहित काय दिसतं!
दिवसभराच्या थकव्यामुळे, मी तशीच पडून रहाते
बाळासारखं थोपवून, त्याला निजवयाचा मी प्रयत्न करते.

डोळ्यात स्वप्न बिप्न घेऊन, मन तिथेच उडत राहतं
चंद्रावर एका क्षणात, तर दुसऱ्या क्षणी जमिनीवर येतं
गुलाबाच्या लाल पाकळ्यात, कैद होते त्याची नजर
वेळ घेऊन श्वास घेत, लुटत बसते फुलांचे अत्तर.

सतारीच्या मैफिलीत, मग त्याला आठवतो तो सुवास
दाद देत डोळे मिटून, साठवून ठेवतो तो प्रवास
त्याच क्षणी वाटते त्याला, भिजून जावे शाईत चिंब
चार आठ ओळी कवितेच्या, माझेच का हे प्रतिबिंब?

अंगणातल्या झाडाखाली, पटकन ठेऊन तो उशी
ऊन्ह अंगावर घेत दुपारी, पडून राहते चार घडी
स्वप्नातल्या स्वप्नातही, मन गाठते दूरदेशीचे काठ
चारच्या चहासाठी मात्र, गपगुमान येते घरात.

आता मात्र हद्द होते, रात्र माझी सरू लागते
गाढ झोप लागली म्हणताच, मन पुन्हा भरकटत जाते
सकाळचा रामरगाडा, दिसू लागतो डोळ्यासमोर
झोपेतच डबे भरणे, झोपेतच घेऊन होतो निरोप.

गयावया करून, मी मनास जरा जवळ बोलावते
कसली ही चलबिचल तुझी, काळजी वाटून विचारते
मन आता शांत होते, सांगू लागते त्याची कथा
उपाय आहे तुझ्यापाशी, ऐकून घेशील का माझी व्यथा?

पहाटेच्या तांबड्या सोबत, मेंदूची तू होतेस गुलाम
घड्याळाच्या काट्या सोबत, सुरू करतेस बेलगाम काम
धावाधाव करून, पोहोचतेस एकदाची तू कचेरीत
खुर्चीमध्ये रुतून बसतेस, तासंतास तू तशीच.

हांजी हांजी करत असतेस, बुद्धी सांगेल तेच करतेस
ती म्हणते उठ बस, शांतपणे ते ही ऐकतेस
सकाळपासून रात्रीपर्यंत, चालत असते रहाटगाडगे
हात पाय कान डोळे, सगळ्यांसाठी सारखेच पाढे?

तेच तेच सुरु आहे, वर्षे तपे कितीतरी
दोन घटका श्वास घे, ऐकशील का आतातरी
मनाचं काही ऐकत नाहीस, मनाशी काही बोलत नाहीस
सुखं असतील पायापाशी, पण मनासारखं करत नाहीस!

म्हणूनच मी येतो बाहेर, रात्रीच्या ह्या शांत वेळेत
साऱ्या इच्छा ठाऊक तुझ्या, गुंफून ठेवतो एका माळेत
रोज दमून झोपतेस खरी, मनाला दमावतेस का कधी?
अर्धवट राहिलेल्या मनसुब्यांना, 'बाहेर पडा' सांग आधी.

बागेत थांबून हिरवळ बघ, गवतात झोपून आकाश बघ
मैफिलीत स्वतः गाऊन बघ, समुद्रात जाऊन पोहून बघ
नुसत पडून वेळ काढ, नुसती शिकरण पोळी वाढ
आभाळभर पाऊस येताच, तिन्हीसांजा भिजून काढ.

नाहीतर रोज असाच येईन, झोपमोड करत राहीन
मनासारखं रोज कर, सुखाची हमी मी देईन
माझा काही रोष नाही, बुद्धी काही खल नाही
तिच्यामुळे मिळते सिद्धी, मनःशांती माझे ठायी.

मनाचाही विचार कर, आराम द्यायला स्वतःला शिकव
मनापासून हसून रोज, विराम देऊन पंख पसर
कुणास ठाऊक काय झालं, मनानी मला शांत केलं
एका क्षणात मला अलगद, निद्राधीनाच्या सुपूर्त केलं

इतके सोपे होते उत्तर, मनाशी कधी ना झाली ओळख
संघर्ष म्हणून ज्याला भ्यायले, त्यानेच दिली शिकवण परखड
संघर्षाविना न ये प्रचिती संघर्षाविना ना कुणा सुमती
संघर्ष असे जितका बलवान मात करेल, तो होई महान.

**प्रिया गोडबोले**
pvgobo@gmail.com

## आठवणींचा खजिना

आठवणी, काही काळानंतर त्या आठवणीच राहतात म्हणूनच आठवणी ह्या अमूल्य आहेत. आयुष्यातले प्रत्येक क्षण हे आठवणी होऊ शकतात. त्यातून आपल्या माणसांबरोबर घालवलेले क्षण, त्यांच्या बरोबरचा सहवास तेच नंतर आठवणी म्हणून काळजाचा ठाव घेतात.

लहानपणी भावंडा बरोबर घालवलेले क्षण, ते सुट्टीचे दिवस, शाळा संपल्यानंतर घरासमोरच्या अंगणात खेळलेले वेगवेगळे खेळ. लपाछपीच्या खेळात सापडलेल्या नवीन जागा. पत्त्याच्या खेळात प्रत्येकाची स्मरणशक्ती आजमावताना येणारी मजा, असे एक ना अनेक क्षण आठवणींच्या पोतडीत जाऊन बसलेले. सुट्टीत आजी आजोबांबरोबरचे क्षण, आजोबांबरोबर सकाळी सकाळी फिरायला गेलो असताना त्यांच्या बरोबर मारलेल्या गप्पा. आजी बरोबर तिची खास गाणी गाताना, तिच्या हातचा खास चवदार चिवडा खाताना मारलेल्या गप्पा. हे सगळे आता आठवून वाटते की किती बहारदार होते ते दिवस ते क्षण, असे म्हणत त्याच आठवणीत मन रेंगाळते.

आयुष्याच्या या टप्प्यावर पाहताना जाणवले की, जे काही कमावले आहे त्यामागे आई वडीलांचा किती हात आहे ते. कळत नकळत आईने कशी मनगटात ताकद दिली. वडीलांनी आत्मविश्वास कसा दृढ केला. कुठलीही गोष्ट करताना वडीलांचे सांगणे असे की काहीतरी नवे करा, नवे मार्ग चोखंदळा, असे नेहमी प्रोत्साहन देत राहिले.

मी तिसरीत होते तेव्हा अगदी वार्षिक परीक्षेच्या काही दिवस अगोदर अभ्यासक्रम बदलला. तेव्हा तो समजून घेण्यासाठी शाळेने काही पुस्तके दिली आणि ती एक दोन दिवसातच शाळेला परत करायची होती, तर त्या लहान वयात पण त्याचे महत्व समजून मी ती पुस्तक वाचायला लागले तेव्हा आई माझ्या बरोबर रात्रभर जागी राहून मला वाचायला आणि समजावयाला मदत करत राहिली. खरं तर शेवटच्या क्षणी हा अभ्यासक्रम समजावून घेणे तितके आवश्यक नव्हते. पण माझी त्यातली आवड बघून दुसऱ्या दिवशी जरी कामाचा डोंगर होता तरी माझ्यासाठी, मला प्रोत्साहन देण्यासाठी माझ्याबरोबर रात्रभर जागी राहिली. आता जरी ते आई बरोबरचे क्षण आठवले तरी सुखावयाला होते व पूर्वीच्या आणखी काही आठवणी ताज्या करतात.

आईची प्रत्येक गोष्ट सांगायची एक विशेष पध्दत होती. एक प्रसंग आठवतो, तो असा की, दिवाळीच्या यमव्दितीया या दिवशी कणकेचा दिवा करुन त्यात काळ्या कापडाचा काकडा, म्हणजे वात करुन तो दिवा तुळशीपाशी रात्री दक्षिणेकडे तोंड करुन लावायचा, आई सांगायची, “जरा तो कणकेचा दिवा करतेस का? मग त्यात काळ्या कापडाची वात करुन लाव.” मग काय करायचे हे विचारले तर सांगणार, “रात्र झाली की बाहेर तुळशीपाशी दक्षिणेकडे तोंड करून लावा.” सरते शेवटी उत्सुकतेपोटी विचारले की “हे सगळे कशासाठी?”, तर सांगणार “यमव्दितीयेच्या दिवशी हा असा यमदिप लावायचा, आणि या मुहूर्तावर घराच्या दक्षिण बाजूस दिवा लावणे शुभ मानले जाते. दक्षिण ही यमाची बाजू म्हणजेच, यम ज्या बाजूने येतो अशी ओळखली जाते. यम दीप दक्षिणेकडे लावल्यास, यम प्रसन्न होऊन आल्या पावली मागे निघून जातो अशी समजूत आहे. घरातल्या सगळ्यांच्या उदंड आयुष्यासाठी आणि निरोगी स्वास्थ्यासाठी हे करायचे.” हे असे इतक्या साध्या सोप्या भाषेत आणि त्या बद्दलची कृती करता करता सांगितले म्हणून नकळत मनात रुजले गेले होते. आता कधीही दिवाळी म्हंटले की हा प्रसंग, त्या वेळेचे संभाषण आठवते आणि त्याच सांगितलेल्या पद्धतीने यमदिप केला जातो.

तसेच मला गाण्याच्या कार्यक्रमाला जायला आवडायचे. तेव्हा एक सांगीतिक कार्यक्रम, ३ रात्री - रात्रभर असायचा. तेव्हा माझे वडील माझ्याबरोबर यायचे. एक वेळी कार्यक्रमाच्या ठिकाणी आल्यावर मी माझ्या मैत्रिणी बरोबर पुढे स्टेज जवळ बसायला गेले. तेव्हा वडील म्हणाले “माझी काळजी करू नको, मी बघेन कुठे बसायचे ते.” रात्रभर कार्यक्रम झाल्यावर सकाळी घरी जाण्यासाठी मी त्यांना शोधत होते, घरी जाताना मी विचारले “कुठे बसला होता?” तर वडील म्हणतात कसे, “मला झोप यायला लागली तर एका जिन्याच्या इथे कोणी येणार नाही, जाणार नाही हे बघून चक्क पैकी सुरांच्या वातावरणात झोपलो होतो.” हे असे माझे वडीलच म्हणू शकतात. खर तर त्यांना झोप अनावर होते तरी मला गाण्याचा कार्यक्रम ऐकायचा होता म्हणून माझ्या बरोबर आले होते. आता सुध्दा कधीही गाण्याच्या कार्यक्रमाला गेले की ‘सुरांच्या वातावरणात मी झोपलो होतो’, हे वडीलांचे शब्द आठवतात आणि हसू पण येते की, कसे वेगळे विचार आहेत. असे एक ना अनेक क्षण आई वडिलांबरोबरचे आहेत, काही भावनिक, काही सतत प्रेरणादायी, काही अगदी आत्तापण आठवले की हसू येणारे. ज्याचे मूल्य

करता येते, त्या मूल्यांमुळे आपली सांपत्तिक स्थिती कशी आहे ते जगाला कळते. मग ते परंपरागत असोत की स्वतः कमावलेले असोत, पिढी-तत्पिढी त्यात वाढ होत राहिली तर तोच कुटुंबाचा खजिना म्हणून गणला जातो.

तर याच धर्तीवर आठवणी ज्या जपलेल्या, दर दिवशी नव्याने तयार होणाऱ्या, त्यांचे भावनिक मूल्य - अमूल्य आहे. आप्तजनांच्या, मित्र परिवारांच्या आठवणी नेहमी मनात त्यांच्याच आठवण जाग्या ठेवणाऱ्या असतात. काही काही आठवणींवरून तर आप्तस्वकीय अगदी आता आपल्या जवळच आहेत याची जाणीव होते.

तर अशा आठवणींबरोबर जेव्हा आपण जगत असतो, तोच आपला खजिना होऊन जातो. आपल्या आठवणींचा खजिना.

**उत्तरा भालेराव**

uttarab@hotmail.com

## सखा कृष्ण

माझा सखा ग कृष्ण हरी.
गर्द निळे मोरपीस ज्याचे शिरी

स्मित हास्य विलसे वदनी
नमन त्यास जोडूनी करी

असे त्याचे रूप विठ्ठलाचे
पंढरपुर ला भक्तांची वारी

विठ्ठल विठ्ठलाचा गजर होई
भजनं कीर्तनात दंग होत सारी


देई ना रे आता दर्शन मजला देवा
तुझे नाव मनी ओठी, भेटीची ओढ उरी

वाट पहात तुझीच थकले आहेत डोळे
उजाडेल का तो क्षण मग मंगलमय होती सोहळे

**रेखा मुळे**

## मागे वळून पाहू जरा

२० वर्षांपूर्वी व्हॅलेंटाईन डे निमित्त फेब्रुवारी २००४ च्या अंकात प्रकाशित झालेले 'प्रेम-शोधक' गीत या अंकात पुन्हा प्रकाशित करत आहोत.


*'व्हॅलेंटाईन डे' (प्रियतमा दिन) निमित्त*
*'प्रेम-शोधक' गीत,*
*(चाल - 'मेरा जूता है जापानी')*

दर शनि-रविवारी, चौपाटीच्या नाक्यावरी
जातो स्कूटरवर बसून, मारतो लाईन पोरींवरी

आहे मी हिरो रूपारेलचा, शोक मला सिनेमाचा
सौंदर्याचा नेहमी भूकेला, शाहीर मी प्रेमाचा
डिम्पल, काजल अन् माधुरी, येती स्वप्नी माझ्या घरी
गाणी प्रेमाची त्या गात, घट्ट मिठ्या मला मारी

पार्क शिवाजी मधुर मनोहर, सतत येथे हो रहावे
लावण्यांचे फिरते प्रदर्शन, दाद देत हो बघावे,
आल्या नीना, वीणा, मीना; तोल डोळ्यांचा राहीना
काय बघावे कळेना, काय करावे ते सुचेना

ही तर अरूणा पालकरांची, कॉलेज क्वीन रूईयाची
टॉप फिगर अन् सुंदर मुखडा, तळमळ होई जीवाची
देवा पाव माझ्यावरी, कर असं कांहीतरी
माझ्याकडे ती बघून, गोड हसेल कधीतरी

कवी - सुहास पै, वेन, न्यू जर्सी,
suhas_alka@yahoo.com
(सुहास पै यांचे 'डालडाच्या तुपात कोण ग तळी' हे विडंबन गीतांचे पुस्तक गेल्या वर्षी प्रसिद्ध झाले आहे.)




(email: milind@clickontours.com)

## अशा सांजवेळी

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
रम्य रम्य प्रहरी, नदीच्या किनारी
वाऱ्याची मंद मंद झुळूक वाहिली

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
रम्य रम्य प्रहरी, सूर्यास्त काळी
डोंगर माथ्याशी उन्हे सावळी

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
रम्य रम्य प्रहरी, निळ्या निळ्या आभाळी
घरटी परतती पक्ष्यांच्या ओळी

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
रम्य रम्य प्रहरी, एका तरुतळी
प्रेमगुज प्रेयसीचे प्रिया जवळी


अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
परतीच्या वाटेवर, आठवण दाटली
बाळाच्या ओढीने आई धावली

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
आईबाबांचा धरून हात हाती
दुडुदुडु दुडू पावले हरीची धावली

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
रम्य रम्य प्रहरी, सृष्टीच सगळी
शामसुंदराच्या रंगात रंगली

अशा सांजवेळी, अशा सांजवेळी
रम्य रम्य प्रहरी, श्रीरंगाची मुरली
नाद मधुर करीत अंतरात गुंजली

**अश्विनी तासगांवकर**



**NAMASKAR** 🙏

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

**Subscription Remittance Address:**
**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**


BMM
बृहन्महाराष्ट्र मंडळ

**Reshimgathee**

नाते जुळते मनाशी मनाचे



A BMM Matrimonial initiative for
Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

BMM
मराठी
शाळा

Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines and supporting materials.

The BMM-Bharti Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations after
successful completion of each level and
passing criteria.

For BMM Marathi Shala inquiries
Email : Shala@bmmonline.org

https://bmmshala.net/

# A Glorious Tapestry of Social work and Friendship

(In Memory Of Late Shirish Gupte)

In the realm where flowers lose their scent to the whispering wind,
A friend departed, leaving memories, a tapestry of emotions, finely pinned.
Friendship, a sacred vessel, brimming with moments so dear,
Year by year, it crafts new tales, whispers in the heart, crystal clear.

In the quiet corner of the mind, these memories find a space,
Never crowded, but when one emerges, a flood, an emotional embrace.
Today, it's Shirish, his essence lingering, memories in a rush,
A symphony of moments, a life beautifully woven, a tender hush.

Dilip's home, the stage for our first encounter, Shirish, listening in silence
Marathi Films' 50th anniversary, a dream, a vision, a scene.
As I departed, Shirish embraced responsibility, a leader in the making,
Washington DC events, his canvas, cultural dreams in the undertaking.

Marathi Vishwa and Maharashtra Foundation, his heart found a home,
Ideas for the Marathi soul, Shirish's passion freely roamed.
Entertainment, his muse, from one-act plays to Durga Zali Gauri's grace,
The next generation, a testament, cherishing those moments we embrace.

Planning to execution, a maestro in the cultural symphony,
Stage lights, microphones, recipes – his tools of harmony.
Fundraising for the Foundation, a chapter added with grace,
In every program, a piece of Shirish's heart found its place.

From city to city, BMM conventions, Foundation's journey so grand,
Moments shared, laughter resonating, friendships that withstand.
A woman once said, captivated by our joyous spree,
"I decided to join instead of being jealous," our laughter, the key.

Cultural legacies, born of like minded souls,

Kamu, Hrushikesh, Shaila, Padte, Panse and Jagdish– the ensemble grows.
Legends like Kamerkar and Nerurkar joined the theatrical dance,
Magnanimous hearts, weaving stories, creating a lasting trance.

Lucky, I feel, for the bonds we forged, in joy and jest,
Dilip, Sunil, Shirish and I, our foursome put to the test.
Fishing trips to Hyannis, Shirish's pool side cheer,
Meatballs divine, a culinary legacy we hold dear.

A challenging dance, juggling work, family, and Foundation's grace,
How did he manage, you ask? The answer: Darshana's embrace.
Supported by love, Darshana, Eshani, Soham, Gautam, Megan by his side,
Every moment, a treasure, in the journey called life.

Dilip's departure, Sunil's goodbye, Shirish carried the weight,
Yet, a smile of satisfaction, his final fate.
In his weariness, lies a beauty profound,
For the legacy he left, in every step, it is found.

In the tapestry of friendship, where memories entwine,
Shirish, a chapter, a friend forever, a love so fine.
As he journeys beyond the horizon's bend,
In our hearts, his memory, an eternal friend.

**Rajan Gadkari**

## सारे बदलले

साधारण १९९५ च्या सुमारासचा काळ होता. नरसिंहराव सरकारने मुक्त अर्थव्यवस्था म्हणजे 'ओपन इकॉनॉमी' केल्यामुळे, भारतात जागतिकीकरणाचे वारे वाहायला नुकतीच सुरुवात झाली होती... आणि त्याच सुमारास अमेरिकेतील कमलाकर पेंडसे हे भारत भेटीसाठी आले होते. कमलाकरजी हे ज्ञान प्रबोधिनीचे जुने परिचित. ही संस्था महाराष्ट्रात काही चांगले काम करत आहे हे त्यांनी पाहिले होते.

या भेटीत त्यांनी भारतातील दारिद्र्य जवळून पाहिले आणि ज्ञानप्रबोधिनीच्या संचालकांना अमेरिकेत परतल्यावर पत्र लिहिले. त्या पत्रामध्ये पेंडसे यांनी स्पष्ट उल्लेख केला होता की "आजपर्यंत भारतात विकासाची कामे सबसिडीवर आधारित होती. लोकांना गरीबीच्या नावाखाली 'घ्यायची' फार सवय लागली आहे, पण आता लोकांनी आपला विकास स्वखर्चाने केला पाहिजे. नोबेल पारितोषिक विजेते महम्मद युनुस यांच्या कामाचा अभ्यास करा व लोकांना शिकवा की विकासासाठी गरज असेल तर कर्ज सुध्दा घ्या! असे प्रयत्न ज्ञान प्रबोधिनीने करावेत त्यासाठी मी आर्थिक मदत करायला तयार आहे कारण असे केले तरच विकास टिकणारा होईल."

त्या संवादातून ग्रामीण बँकेची कल्पना पुढे आली. त्याची नुसती मांडणी करून पेंडसे थांबले नाहीत तर महाराष्ट्र फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी पहिली देणगी पाठवली सुद्धा!

....आणि ज्ञान प्रबोधिनीच्या 'महिला बचत गट' ह्याच्या ग्रामीण कामाला सुरुवात झाली! हे बचत गटाच्या कामाचे त्रिदशकपूर्तीचे वर्ष! या कामाच्या पहिल्या १० वर्षात श्री. पेंडसे यांनी प्रबोधिनीवर जो विश्वास दाखवून आर्थिक मदत केली त्यातून या कामाची पायाभरणी झाली.

१९९५ साली मी या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली तेव्हा आर्थिक उपक्रमातून स्वयंपूर्णतेचे काम करणे किती अवघड आहे याची कल्पनाच नव्हती.

बचत गटाच्या या उपक्रमाची सुरवात पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील शिवापूर भागात झाली. बचत गटाच्या या उपक्रमामुळे, ग्रामीण महिला बचतीच्या निमित्ताने एकत्र येऊ लागल्या होत्या. पण, शेतात मजूर म्हणून महिनाभर राबणाऱ्या शेतमजूर महिलेला महिन्यातल्या एका दिवसाची मजुरी फक्त रु. २५/-. बचत करायला नवरा/सासऱ्याची परवानगी काढावी लागत होती आणि वाईट गोष्ट अशी की परवानगी मिळत होती असे नाही. कारण महिलेला काय कळतंय पैशातलं? हा समाजाचा दृष्टिकोन!! त्यामुळे महिला बचत गटात जमा झालेले रु १५०० - २००० मोजायची सुद्धा महिलांची हिंमत होत नव्हती. पुरुष माणसाशिवाय पैशाचा व्यवहार करणे हे शक्यच वाटत नव्हते कारण, तसे यापूर्वी कधीच केले नव्हते. अशी बचत गटाच्या कामाची पार्श्वभूमी होती. त्यामुळे पैसे मोजायला शिकवण्यापासून, ते कसे वापरायचे? कशासाठी वापरायचे? हे सगळेच शिकवायला लागणार होते. ग्रामीण महिलांचे भावविश्व मर्यादित असल्यामुळे जगाच्या चालीरीतीचाही गंध नव्हता. पुण्यापासून अवघे २५ किलोमीटरवर राहात असल्या तरी अनेकांनी पुणे कधीही पाहिले नव्हते. तेव्हा ना आत्ता सारखे फोन होते, ना रस्ते!

बचत गट म्हणजे काय तर कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त २० जणींनी, महिन्यात एकदा एकत्र यायचे. सगळयांनी सारखी ठराविक बचत करायची. जमलेले पैसे त्या गटातल्याच सभासद महिलेला ५ - १० महिन्यासाठी कर्ज द्यायचे व तिने पुढच्या महिन्यात बचती सोबत परतफेड करायचे. साधा सरळ उपक्रम. साधारण तासाभरात सगळं करुन संपणारा! जेव्हा बचत रु. २५/- होती तेव्हा कर्ज रु. ३०० - ४०० दिली जायची. आता बचत रु. १०० - २०० आहे तर कर्ज रु. ४००० - ५००० दिली जातात. अशी खावटीच्या कर्जाची ५ - ७ महिन्यांपुरती कर्जाची गरज आहे, ती या उपक्रमाची सभासद होणार आणि त्यामुळे गरजू गटापर्यंत पोचणार!!

सावकारी पाशातून ग्रामीण समाजाची मुक्तता व्हावी म्हणून शासन धोरणाने, अशा गटांना बँकेत खाते काढून कर्ज मिळण्याची व्यवस्था केली. आणि सारे बदलले!

बचत गटामुळे ग्रामीण महिला घराबाहेर पडली. तिचे जाती पलीकडे गाव म्हणून, एकत्र आल्यामुळे सोशलायझेशन झाले. त्यामुळे ती आर्थिक रचनेच्या मुख्य प्रवाहात आली. थेट बँकेपर्यंत पोहोचली. बँकेबद्दल मनातील भीती कमी झाली. सुरुवातीला आम्ही बँकेत सहली सुद्धा काढल्या. मग एकेका गटाची बचत खाते काढायची तयारी झाली. महिन्यातून एकदा, बचत गटासाठी एकत्र येऊन सभासद महिला, त्या त्या बचत गटाचे सगळेच व्यवहार करत होत्या. त्यामुळे गटातील महिलांच्या गरजांवरही विचार होत होता, चर्चा होत होती. एखादीच्या मुलीसाठी स्थळ बघायला सुरुवात झाली की ठरल्यावर कर्ज लागेल असे बुकिंग व्हायला लागले. सुरुवातीला कर्ज घेणे हे सुद्धा अवघड वाटत

होते कारण चारचौघात स्वतःची आर्थिक गरज मांडायची सवयच नव्हती. बचत गटातून महिन्याला २% ते ३% दराने कर्ज वाटप केले जात होते. त्या सुमारास खाजगी सावकारीचा कर्जाच्या व्याजाचा दर महिन्याला ७% - १०% इतका म्हणजे परतफेडीसाठी अशक्य होता. अशा सावकारीमुळे, देशोधडीला लागलेली कुटुंबे, लोकांच्या आजूबाजूला असल्यामुळे कर्ज घेण्याचे हिम्मतच होत नव्हती. बचत गटाने सुरक्षित कर्ज घेऊन परवडणाऱ्या हप्त्यात चोख कर्ज फेडायला शिकवले.

पैसे मोजायला शिकता शिकता अनेक जणी गटामुळे, सन्मानाचे कर्ज घ्यायला शिकल्या व कर्ज फेडणाऱ्या झाल्या! आजपर्यंत बाजारात कुठेही पत नसणारी महिला, बचत गटाच्या चोख कर्जफेडीमुळे बँकेसाठी चांगली 'कस्टमर' ठरली, हे वेगळे सांगायला नकोच. या तिच्या आर्थिक विषयातील सहभागाने, मायक्रोक्रेडिटचा हा उपक्रम जगातील सर्वांत मोठा ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम ठरला.

ग्रामीण महिलांनी बचत गटातून किरकोळ घरखर्चासाठी कर्ज घेतले, तसे एक हंगामामध्ये येणाऱ्या वांगी, कांदा, टोमॅटो अशा पिकासाठी सुध्दा कर्ज घेतले. त्यातून चार पैसे कुटुंबात खेळते झाले. कष्ट हक्काचे असले तरी दर्जेदार बियाणे, वेळेला खत द्यायला २ - ३ महिनेच थोडे फार भांडवल लागायचे ते गटाने पुरवले आणि तिला कमवते केले. कधीतरी पैसे नाहीत म्हणून दुखणे आले तरी दवाखाना पुढे ढकलणारी महिला गटातून वेळेत पैसे मिळाल्यामुळे स्वतःच्या सुद्धा आरोग्याची काळजी घेऊ लागली. तिच्या Quality of life मध्ये फरक पडला, तो बचत गटाकडून मिळालेल्या माहिती मुळे! किती तरी बारीक बदल झाले - 'माझे नाव रेशनच्या कार्डावर लागले पाहिजे' असे कोणाला वाटू लागले, तर 'माझे शिक्षण झाले नाही पण पोरीला मात्र पदवीपर्यंत शिकवणार!' म्हणणारी 'मुली'ची आई गटामुळे तयार झाली. सर्वसमावेशक रचनेत राजकीय हस्तक्षेप नसून सुध्दा किती ताकद आहे, याचा पथदर्शी प्रकल्प या निमित्ताने उभारला गेला. एकदा ही पायाभरणी झाल्यावर महिलांचा आरोग्य शिबिरातला प्रतिसाद फक्त हिमोग्लोबिन तपासणी पुरता न राहता, रक्तदानापर्यंत पोचला.

पेंडसे यांनी चार वर्षापूर्वी भांडवलाला वापरता येईल अशी देणगी दिली. त्या पैशातून आधुनिक बिन धुरांच्या चुलीसाठी वापरता येणारी इंधन कांडी बनवणारे युनिट सुरू झाले.

या प्रवासाची सुरुवात जरी आर्थिक असली तरी परिणाम फक्त आर्थिक नव्हता. या उपक्रमात सामाजिक बदल घडवण्याची ताकद होती. 'ती'च्या मुळे कर्ज घरात आले त्याचा परिणाम घरात 'ती'चे ऐकले जायला लागले.

टिकणारे बदल हे क्रांती सारखे झटपट झालेले नसतात तर सातत्याने, संथगतीने पण निश्चित दिशेने प्रयत्न केल्याचा परिणाम असतो. पेंडसे पाठीशी असल्याने असे टिकणारे बदल घडवण्यासाठी अवधी मिळाला.

पेंडसे यांनी पुन्हा २००० साली, २००६ साली, पुण्यात आल्यावर ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामीण बचत गटाच्या कामाला भेट दिली. महिला आता धिटाईने निवेदन करत होत्या. "कर्ज घेऊन कुटुंबाची कशी प्रगती केली" हे सांगत होत्या. ते सर्व पाहून आणि ऐकून श्री. पेंडसे यांनी कामाबद्दल अतिशय समाधान व्यक्त केले.

१९९५ मध्ये कमलाकरजी यांनी एका देणगीने सुरु केलेल्या कामाची मोठी ठिणगी पुण्याजवळच्या भागात पडली आणि आज तिची एक तेजस्वी अशी अग्निशिखा या भागाला प्रकाश देत आहे.

दुरुन केलेल्या एका छोट्याश्या पण सातत्याने, नेमक्या कारणासाठी केलेल्या मदतीने, अनेक कुटुंबांचा कायापालट कसा होऊ शकतो, याचे श्री. पेंडसे हे मूर्तिमंत उदाहरण आहेत. श्री. कमलाकरजी हे न्यू जर्सी भागातले अतिशय साधे, शांत पण विचारवंत गृहस्थ. बरसणारा ढग उगाचच गर्जना करत नाही. तसेच स्वतःची कोणतीही प्रसिद्धी न करता, गवगवा न करता ते आजही शांतपणे या कामाची प्रगती पहात आहेत. वयाची पंचाऐंशी वर्षे उलटून गेल्यावर एक तृप्त समाधान त्यांच्या मनात आहे. आपल्या मराठी लोकांनी त्यांचा आदर्श मानावा, सत्कार करावा आणि त्यांच्या कामातून प्रेरणा घ्यावी असे श्री. कमलाकर पेंडसे. पुण्याजवळील अनेक खेड्यात ज्या महिलांचे जीवन पालटले, त्या महिला प्रत्येक दिवशी त्यांचा मनोमन सत्कार करत असतात.

बचत गटाच्या केंद्राभोवती आता अनेक कामे उभी रहात आहेत. महिलांना स्वतः:च्या पायावर उभे राहण्यासाठी आज तेथे कौशल्य प्रशिक्षण वर्ग चालू आहेत. 'नवी उमेद' सारखे प्रकल्प चालू आहेत. महिलांचे मेळावे भरतात.

अर्थात आजही अशा कामासाठी आर्थिक मदतीची गरज आहे कारण स्वाभिमानाने जगायचे ठरवले तरी तसे वातावरण असावे लागते, तशी संधी मिळावी लागते, तरच ते जमते! असे करायला रचनेची मदत लागते. ज्ञान प्रबोधिनी सारखी संस्था अशी व्यक्ती निरपेक्ष रचना उभी

करु शकते. ज्ञान प्रबोधिनीने घालून दिलेल्या या रचनेमुळे स्वतःच्या उदाहरणातून गेल्या ३० वर्षात अनेकींनी ‘करुन दाखवले’.

आज ज्ञानप्रबोधिनीची स्वतःची अशी ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन ही संस्था अमेरिकेत (५०१) (C) (३) या नियमाखाली स्थापन झाली आहे. त्याद्वारे अनेक हितचिंतक जोडले जात आहेत आणि त्यांच्या देणग्या मधून आमचे अनेक प्रकल्प उत्तम चालू आहेत.

QR Code to scan for the website

अधिक माहितीसाठी पुढील संकेतस्थळाला भेट द्यावी आणि प्रकल्पाची माहिती घ्यावी. स्वयंसेवक म्हणून कामात सहभागी व्हावे.

(http://www.jnanaprabodhinifoundation.org )

**- सुवर्णा गोखले**

**ज्ञान प्रबोधिनी महिला बचत गट, पुणे**